**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

*CNR No. MHSO060004602011*

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## आदेश निशाणी क्र. १६८ वर

दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रुल ११(ड) तसेच ऑर्डर २ रुल २ सह कलम १५१ प्रमाणे दावा काढून टाकण्यात यावा यासाठी हा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी दिला आहे.

०२. मौजे टाकळी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील गट नं. ५७/३ (मुळ गट नं. ५७) क्षेत्र २ हे. ४२ आर या जमिनीचे दिनांक १६/१२/२००१ रोजीच्या अनोंदणीकृत साठेखताच्या आधारे खरेदीखत होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल करण्यात आला आहे. दाव्यातील सर्व कथने प्रतिवादी यांनी स्पष्टपणे नाकारली आहेत.

०३. प्रतिवादी क्र. ४ यांनी दिनांक ०९/१०/२०१९ रोजी निशाणी क्र. १४९ प्रमाणे अर्ज देऊन आक्षेप नोंदवला की, हा दावा मुदतीत नाही. त्यामुळे तो नामंजूर करण्यात यावा. त्यावर दिनांक १३/१०/२०२१ रोजी आदेश झाला. तो अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

०४. निशाणी क्र. १४९ च्या आदेशाबाबत प्रतिवादी क्र. ४ यांनी मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे सिव्हील रिव्हीजन अर्ज नं. ०१/२०२२ दाखल केला. त्या प्रकरणात मा. ना. उच्च न्यायालय यांनी दि. २७/०१/२०२२ व दि. १८/०२/२०२२ रोजी आदेश देऊन प्रतिवादी क्र. ४ यांना दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २ रुल २ तसेच मुदतीचा कायदा आर्टीकल ५४ प्रमाणे सक्षम कोर्टात योग्य ती नियमाप्रमाणे दाद मागण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार हा अर्ज देण्यात आला आहे.

०५. दाव्यातील कलम ४ मध्ये साठेखताच्या शर्तीप्रमाणे खरेदीखत करुन देणेबाबत दिनांक २१/१०/२००२ आणि ०२/११/२००२ रोजी वादी यांनी नोटीस पाठवली. परंतु प्रतिवादी यांनी खरेदीखत करुन दिले नाही. नंतर वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द नियमित दिवाणी दावा नं. ४७२/२००२ हा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला. तो दावा मा. न्यायालयाच्या परवानगीने दिनांक १५/०९/२०१० रोजी काढून घेतला. आता प्रस्तुत दावा दाखल करुन वादी यांनी नमूद साठेखताआधारे खरेदीखत करुन मागितले आहे. हा दावा मुदतीत नाही. तसेच पुर्वी दाखल केलेला दावा केवळ निरंतर मनाई हुकूमासाठी होता. आता या दाव्यामध्ये खरेदीखत होऊन मिळावे अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच साठेखताआधारे कब्जा दिला असेल तर ते साठेखत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. या प्रकरणातील साठेखताचा दस्त नोंदणीकृत नाही. या सर्व बाबींचा विचार होऊन हा दावा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. ४ यांनी केली आहे.

०६. त्यावर वादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अगोदर याच मजकुराप्रमाणे दिलेला निशाणी क्र. १४९ हा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. त्यावर मा. ना. उच्च न्यायालय यांचेकडे केलेला सिव्हील रिव्हीजन अर्ज नं. ०१/२०२२ प्रतिवादी क्र. ४ यांनी काढून घेतला आहे. कायद्याचा दुरुपयोग करुन प्रकरण लांबवण्यासाठी हा अर्ज दिला आहे. त्यामध्ये कोणताही नवीन मुद्दा अथवा कायदेशीर प्रश्न नमूद केलेला नाही. या अगोदर अशाच आशयाचे अर्ज वारंवार दिले आहेत. ते सर्व नामंजूर झाले आहेत. आता हा दावा वादी यांच्या साक्षीपुराव्यासाठी नेमण्यात आला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०७. प्रतिवादी क्र. ४ तसेच वादी यांचे वकिलांचा प्रदीर्घ युक्तीवाद ऐकला. सचिकेचे अवलोकन केले. मा.ना.उच्च न्यायालय यांनी सिव्हील रिव्हीजन अर्ज नं. ०१/२०२२ मध्ये दिनांक २७/०१/२०२२ आणि दिनांक १८/०२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाचे अवलोकन केले. त्यामध्ये नियमानुसार मुदतीबाबत तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २

रुल २ च्या संबंधी आक्षेप नोंदवण्याची संधी प्रतिवादी क्र. ४ यांना मा. ना. उच्च न्यायालय यांनी दिलेली आहे.

०८. यापुर्वी प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ३३, ३७, ३८, १११, ११४, १३१, १४५ आणि १४९ प्रमाणे अशाच आशयाचे अर्ज दिले आहेत. ते सर्व नामंजूर झाले आहेत. निशाणी क्र. १४९ प्रमाणेच्या अर्जावर पुनर्विचार करावा असे स्पष्ट निर्देश मा. ना. उच्च न्यायालय यांनी दिलेले नाहीत. तर असलेल्या आक्षेपाबाबत कायदेशीररित्या सुसंगत व उपलब्ध स्टेप्स घेण्याची मुभा प्रतिवादी क्र. ४ यांना दिलेली आहे.

०९. प्रकरण मुदतीत आहे किंवा नाही हा प्रश्न कायदा तसेच वस्तुस्थितीशी निगडीत आहे. तसेच अगोदरच्या मा. न्यायालयाने दिलेल्या परवानगीप्रमाणेच हा दावा दाखल केला आहे काय या प्रश्नावर योग्य निर्णय घेणे साक्षीपुरावा नोंदवल्यानंतर सुलभ होईल. प्रकरणात वादमुद्दे निश्चित करण्यात आले आहेत. प्रकरण १० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित आहे. त्यामुळे आता तांत्रीकदृष्ट्या प्रकरणाचा निर्णय करणे योग्य होणार नाही. उभय पक्षकार यांना साक्षीपुरावा देऊन प्रकरणात त्यांची बाजु मांडण्याची पुर्ण संधी दिल्यानंतर गुणदोषावर वादविषयाचा अंतिम व योग्य निर्णय होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे असे मी नमूद करतो. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.08.03 17:05:15 +0530

दि. ०३/०८/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 03/08/2022 |
| Order uploaded on | : | 04/08/2022 |